MAHMAR 2014 / 59740

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये पोहचणारे एकमेव शैक्षणिक मासिक

# प्रेरणा जनहित मंच

कार्यकारी संपादक : **श्रीमती संध्या देशपांडे** संस्थापक संपादक : **प्राचार्य प्रकाश कराळे**

वर्ष : १० । अंक : १ । जानेवारी २०१७ । मूल्य : १५ । अहमदनगर । POST REG. NO. : ANR / 058515-2017

## संघटनेची ५५ व्या वर्षात परिवर्तनशील वाटचाल

**- प्रकाश कराळे (अध्यक्ष)**

महाराष्ट्र राज्य टंकलेखन, लघुलेखन शासनमान्य शैक्षणिक संस्थांची संघटना, मुंबईचे ५५ वे अधिवेशन व आमसभा धुळे च्या खान्देश नगरीत संपन्न होत आहे. या अधिवेशनाच्या निमित्ताने अधिवेशनासाठी उपस्थित सर्व आदरणीय मान्यवरांचे प्रमुख पाहुण्यांचे व महाराष्ट्र राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या संघटनेच्या सभासद, संस्थाचालक व हितचिंतकांचे मी मन:पुर्वक स्वागत करतो.

सतर्कतेने संधीची वाट पाहणे, साहसाने आणि कौशल्याने संधी प्राप्त करणे, शक्ती व दृढतापुर्वक संधीचा फायदा घेवून कार्य यशस्वी करणे ही संघटनेची त्रिसुत्री मानून सर्वांच्या सहकार्याने विशेषतः सर्व राज्य कार्यकारिणी सदस्य, महासचिव शैलेंद्र पाटील, वरिष्ठ उपाध्यक्ष, श्री. गोवर्धन विरकुंवर, परीक्षा सचिव श्री. संजय नाईक, कोषाध्यक्ष सुभाष बागड, उपाध्यक्ष हेमंत ढमढेरे, प्रवक्ते दिनेश पोरे, सहसचिव श्री. संतोष दाणी, उपाध्यक्ष मोहन भोमे, सुनिल भालेराव, राजेंद्र हिरपुरकर, घनश्याम कुंबळकर, सुभाष पाटील, संजय शेंडे, प्रभाकर सुकाळे, अभिलाषा नाईक, प्रसिध्दीप्रमुख निळकंठ कुंभार, सहकोषाध्यक्ष प्रकाश शहा, सहकारी सदस्य, जिल्हा अध्यक्ष व संघटनेचे माजी अध्यक्ष बी. के. शर्मा, माजी सचिव एच. ए. मेहेता, एस. ए. आगटे सर याचबरोबर कार्यकारी सदस्य व आजीव सभासदामधील जेष्ठ व तज्ञ सहकाऱ्याच्या मुळेच गेली ८ वर्षे अध्यक्षपद यशस्वीपणे सांभाळत आहे.

हिंगोली अधिवेशनापासून प्रत्येकवर्षी नवे आव्हान नवा संघर्ष ५० वर्षाची टायपिंगची परंपरा लाभलेल्या टंकलेखन लघुलेखन अभ्यासक्रमास मा. ना. विनोद तावडे साहेब यांचे सहकार्याने संगणक टायपिंग अभ्यासक्रमास सुरुवात झाली. सन २०११ पासून सुरु झालेली संगणक टायपींग जी.सी.सी.-टि.बी.सी.ची वाटचाल आणि याकामी काळाची गरज म्हणून उचलेले पाऊल या दोन्ही संक्रमणाचे

पान २ वर...






# संघटनेची ५५ व्या वर्षात परिवर्तनशील वाटचाल

पान १ वरुन...

आपण सर्वजण साक्षीदार आहोत. संपूर्ण देशात महाराष्ट्र राज्य हे संगणक टायपिंग अभ्यासक्रम सुरु करणारे दुसरे राज्य आहे ही अभिमानाची गोष्ट आहे.

मागील ८ वर्षामध्ये परिषदेने अनेक क्रांतीकारी बदल केले. माझ्या अध्यक्ष पदाच्या काळात सर्वप्रथम राज्यात आदर्श संघटना करण्याचे ध्येय उराशी बाळगले होते. एकवेळ नवीन संघटना सुरु करणे सोपे पण बंद संस्था पुन्हा नव्याने सुरु करणे आणि त्याच सभासदांचा विश्वास संपादन करुन वाटचाल करणेही तितकेसे सोपे नव्हते, तरी आज राज्यात MSCEIA हि आदर्श अशी शिखर संघटना वटवृक्षाप्रमाणे वाढत गेली, आज संघटनेचे २८०० सभासद झाले आहे याचा अभिमान आहे.

संगणकीय युगात सगळीकडे संगणकाचा वापर सुरु झाला कॉलेजेसमध्ये डिग्री, पोस्ट डिग्री असे अनेक संगणक कोर्सेस सुरु झाले आणि माझे संस्थाचालक कुठेतरी भयभीत झाले होते. सुरुवात तर करायची आहे पण मार्ग सापडतनाहीअशीसंस्थाचालकांची अवस्था झाली होती. MSBTE च्या अभ्यासक्रमात संस्थांना शिरकाव मिळाला नाही म्हणून ५० वे अधिवेशनात संगणक टायपीगची मागणी पुढे आली आणि तत्कालीन शिक्षणमंत्री राजेंद्रबाबुजी दर्डा यांचे निर्णयाने शासनाने ३१ ऑक्टोबर २०१३ शासन आदेश निर्गमित केला. याच काळात शालेय शिक्षण विभागाचे मंत्री महोदय, प्रधान सचिव, उपसचिव, कक्ष अधिकारी, कर्मचारी या सर्वांना संघटनेचे महत्व, संस्थांचे प्रश्न व नविन योजना सविस्तरपणे मांडून ती मार्गी लावण्यात यशस्वी ठरत गेलो. त्याच वेळी २०११ साली संस्थेच्या दृष्टीने महत्वाचे म्हणजे आपल्या विषयाची परिपूर्ण माहिती असलेले श्री. महावीर माने यांची महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे आयुक्तपदी आणि नंतर अध्यक्षपदी नियुक्ती झाली त्याच काळात प्रथमच जिल्हा व विभागीय स्तरावर समन्वय समितीची स्थापना, ऑनलाईन मान्यता व नुतनीकरण प्रक्रिया, ऑनलाईन आवेदन, फॉर्म स्विकृती प्रवेशपत्र निकाल, फि वाढ यामुळे परीक्षा परिषद अधिक बळकट होत गेली. १९९१ ची सुधारित नियमावली राबविण्याबाबत उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाचे आदेश आणि शासनाचे आदेश यामुळे संस्थाचालकांना संरक्षण मिळाले. तसेच सुधारित नियमावली १९९१-२०१४ मुळे संपुर्ण राज्यात संगणक टायपींगचे जाळे निर्माण झाले. तिसऱ्या टप्प्यात सुमारे २९६८ संस्थांना ऑनलाईन मान्यता व ऑनलाईन ई-प्रमाणपत्र देऊन परीक्षा परिषदेने क्रांती घडवली. संस्थांना संरक्षण देणाऱ्या १९९१-२०१४ नियमावलीचा महत्वपुर्ण निर्णय घेवुन आदरणीय राजेंद्रबाबुजी दर्डा आणि विदयमान शिक्षणमंत्री विनोदजी तावडे साहेब यांनी संस्थाचालकांना न्याय दिला म्हणुन मी आणि संघटना परीवार त्यांचे नेहमीच ऋणी राहू म्हणुनच संघटना या शिक्षणमंत्री महोदयांना कधीही विसरु शकणार नाही हे आवर्जुन नमुद करत आहे..

शिक्षणमंत्री विनोदजी तावडेसाहेब यांचे शुभहस्ते मुंबई (अंधेरी) येथे ९ ऑगस्ट क्रांतीदिनी या अभ्यासक्रमाचा शुभारंभ झाला आणि संस्थाचालकांमध्ये नवचैतन्य पहावयास मिळाले. ३५०० संस्थांपैकी २९६८ संस्थांनी संगणक सेटअप पुर्ण करुन १ वर्षात शासनाचे ई-गर्व्हनर व पेपरलेस धोरणांचा स्विकार केला. हे क्रांतीकारी ''परिवर्तनच'' म्हणावे लागेल. सन २०१३ ला शासन आदेश निर्गमित झाल्यावर सन २०१५ मध्ये प्रथम परीक्षा होण्यास झालेला विलंबामुळे पुन्हा संस्थाचालकांत सभ्रंम निर्माण झाला परीक्षा होतील का? संगणक अर्हता मिळेल का? अशी भिती निर्माण झाली. पर्यायाने अकोले अधिवेशनात पुन्हा मॅन्युअल टायपिंगची मागणी झाली व आमसभेत ठराव मंजुर झाला. संघटनेने शासन दरबारी पत्रव्यवहार करुन राज्य परीक्षा परिषदेत दोन सत्रासाठी मुदत वाढ मिळणे कामी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. याकामी परीक्षा परिषदेचे अध्यक्ष गंगाधर म्हमाणे व प्रभारी आयुक्त राजेंद्र गोधणे व सर्व अशासकीय सदस्य यांनी सहकार्य केले. प्रस्ताव मंत्रालयात जाताच वरिष्ठ उपाध्यक्ष गोवर्धन विरकुंवर यांनी आमदार तान्हाजी मुटकुळे यांना सोबत घेवुन पाठपुरावा सुरु केला. त्यात रत्नागिरीचे संस्थाचालक आणि नुतन नगराध्यक्ष राहुल पंडीत यांनी आमदार श्री.उदय सामंत व आमदार राजन साळवी यांना सोबत घेतले. कोल्हापुरचे संस्थाचालक धर्मराज पंडीत व पदाधिकारी यांनी आमदार राजेश क्षिरसागर यांना सोबत घेतले. औरंगाबादचे श्री. महेश माळवतकर, राजेंद्र वाणी, दिलीप कुलकर्णी यांनी आमदार अतुल सावे यांची मदत घेतली. उपाध्यक्ष हेमंत ढमढेरे संस्थाचालक गिरिष टिभे यांनी आमदार योगेशदादा टिळेकर यांची मदत घेतली. माझे नगर जिल्ह्याचे पालकमंत्री, नामदार राम शिंदे यांनीही यात लक्ष घालुन सहकार्य केले. दोन सत्राची मुदतवाढ मिळणे कामी अनेक शिष्टमंडळ शिक्षणमंत्री यांना भेटले व २०१७ पर्यंत मॅन्युअल टायपिंग सुरु ठेवण्यास मोलाची साथ दिली या सर्वांचा मी ऋणी आहे.

पुढे चालुन हा निर्णय काहीना जिव्हारी लागल्याने त्यांनी न्यायालयात जावुन आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला. मात्र नागपुर उच्च न्यायालयात संस्थाचालक व संघटनेची बाजु भक्कमपणे मांडणारे जनरल सेक्रेटरी शैलेंद्र पाटील आणि त्यांचे नागपुर जिल्हयातील संस्थांनी महत्वपुर्ण योगदान दिले आणि शासनाचा निर्णय कायम ठेवुन न्यायालयाने मुदतवाढीवर शिक्कामोर्तब केले आणि मॅन्युअल टायपिंग २०१७ पर्यंत चालु राहण्यास मदत झाली. यामुळे आज राज्यात ९० % संस्थाचालक संगणकाकडे परिवर्तन करत आहेत. हि आनंदाची बाब आहे.

शासनाने ३१ ऑक्टोबर २०१३ रोजी शासन आदेश निर्गमित करुन एक सुवर्णभेट दिली. राज्यातील शासनमान्य संस्थांना आणि त्यावर अवलंबुन असणाऱ्या १० हजार कुटुबांना नवसंजीवनी देणारा अभुतपुर्व असा निर्णय राज्याचे शिक्षणमंत्री राजेंद्रबाबुजी दर्डा यांनी शासन आदेशाच्या रुपाने देवुन राज्यातील संस्थाचालकांना दिलासा दिला आणि ९ ऑगस्ट २०१५ ला शिक्षणमंत्री विनोदजी तावडे साहेब यांनी प्रत्यक्ष अभ्यासक्रम सुरु करुन संस्थाचालकांना ''अच्छे दिन'' आल्याचा आनंद मिळवुन दिला. याच काळात संगणक टायपिंग दोन सत्राच्या परीक्षा सुरु झाल्या ९ ऑगस्ट हा क्रांतीदिन संगणक टायपिंग दिन म्हणुन साजरा करण्यास सुरुवात झाली. सांघिक शक्तीमुळे संघटनेला यश आणि राजाश्रय मिळाला याचा आनंद आहे.

शासन आदेश ३१ ऑक्टोबर २०१३ व सुधारित नियमावली १९९१-२०१४ अन्वये सुरु झालेल्या संगणक टायपिंग अभ्यासक्रमास काही खाजगी व्यक्ती व संस्थांची नजर लागली. त्यात राज्य परीक्षा परिषदेने सुधारित नियमावली २०१६ तज्ञाच्या संमतीने तयार करुन काही छोट्या मोठ्या दुरुस्त्या सत्र बदल परीक्षा मंडळ ऐवजी परीक्षा परिषद, मॅन्युअल प्रमाणे संगणक टायपिंगच्या पुर्व अटी या शासनाकडे मंजुरीस पाठविल्या गेल्या. त्या अनेक दिवस मंत्रालयात प्रलंबित राहिल्या त्या मंजुरीकामी संघटनेने प्रयत्नही केले. याकामी सुमारे २२ विदयमान आमदार महोदयांनी शिफारसपत्रे हि दिले मात्र ५ डिसेंबर २०१६ ला सुधारित नियमावली २०१६ शासन आदेश निर्गमित होवुन प्रसिध्द झाला. त्यात नियमावलीचे पालन करुन संगणक सेटअप असणारे, शासनमान्यता घेऊन संस्था सुरु करणारे व गेली ५० वर्षे कोणतेही अनुदान न घेता संस्था चालविणारे या सर्वांचा विसर पडुन हि नियमावली बहिस्थ विदयार्थ्याच्या नावाखाली खाजगी अनधिकृत संस्थांना कशी पुरक होईल अशी ''बहिस्थ विद्यार्थी'' शब्द रचना आल्याने संपुर्ण राज्यात हाहाकार सुरु झाला. संस्थाचालकांचे दुरध्वनी येवु लागले. बहिस्थचा फायदा ज्या अनधिकृत संस्थांना होणार त्यांनी वर्तमान पत्रातुन बातम्या छापुन आणल्या आणि ५ डिसेंबर २०१६ हा आमच्यासाठी काळा दिवस ठरला.

५ डिसेंबर मुंबईहुन परत येताना गाडी चालविणेही मुश्किल झाले. काय करावे सुचेना? ३५०० संस्था चालकांचा घात झाला! १० हजार निर्देशकांवर उपासमारीची वेळ आली. शासनाने संगणक टायपिंग दिले म्हणुन मॅन्युअल बंद झाले. संगणक गेले मॅन्युअल गेले. ही भावना मनात येवु लागली. सर्व काही संपले असे वाटु लागले. मात्र पुन्हा विचार केला. नियमावली तयार करताना आपण स्वत: अशासकिय सदस्य असताना अशी शिफारस झाली नाही हि खात्री होती. तंज्ञांचे दुरध्वनी आले आम्ही असे काही सुचविले नाही. ५ ते ८ डिसेंबर सर्व कागदपत्रे मिळविली अभ्यास केला, मान्यवरांचे मार्गदर्शन घेतले आणि नागपुर येथे जावून शिक्षणमंत्री मा. विनोद तावडे साहेबांच्या सर्व कानावर घालायचे ठरविले काय करायचे होते, काय घडले हे सांगायला मात्र भिती वाटत होती तावडे साहेब ऐकतील का? त्यात काही सदस्यांनी, संस्थांनी धरणे आंदोलनाची मागणी केली. पाठींबा दिला आणि ९ डिसेंबर २०१६ रोजी नागपुर गाठले. १६ डिसेंबर २०१६ धरणे आंदोलन अनेक आमदार महोदयांच्या भेटीगाठी शिक्षणमंत्री तावडे साहेब यांची वारंवार भेट असे ७ दिवसांचे प्रयत्न सुरु झाले राज्यातील सुमारे २५ आमदार महोदयांच्या प्रत्यक्ष भेटी संपुर्ण राज्यात एकाच वेळी जिल्हाधिकारी (सर्व) यांना निवेदने दिली सर्व संघटना व पदाधिकारी भयभित होऊन आपआपले मतदार संघातील आमदारांना भेटत होते. अशा प्रकारे पाठपुरावा चालु असताना दिनांक १५ डिसेंबर २०१६ रोजी आमदार अतुलजी सावे, आमदार सुरजितसिंह ठाकुर, आमदार तान्हाजी मुटकुळे यांनी पुढाकार घेऊन शिष्टमंडळासह शिक्षणमंत्री तावडे साहेबांची भेट घेतली व बाजु मांडली आणि साहेबांनी ऐकले न्याय मिळेल अशी खात्री झाली. १६ डिसेंबर तारखेचे आंदोलन थांबवावे वाटले मात्र माझे सहकारी आंदोलनात माघार घेण्यास तयार नव्हते सातारा पासुन गाडया निघाल्या आता काय करायचे पुन्हा साहेबांना राग येईल का काय होईल ही भिती असताना काही सुचत नव्हते. १६ तारीख उजाडली सुमारे ८०० संस्थाचालकांचा जमाव आंदोलनस्थळी उपस्थित झाला. सर्वांना तावडे साहेब आपले बरोबर आहेत आम्ही त्यांना वारंवार भेटत आहोत काळजी करु नका असे सांगत होतो. यावेळी आमदार भारतनाना भालके, माजी मंत्री दिलीप सोयल, आमदार राहुल बोंद्रे, आमदार शशिकांत शिंदे, आमदार संग्राम जगताप यांनी आंदोलन स्थळी येवुन धीर दिला. अशासकिय सदस्य रमेश खानविलकर, महेश माळवतकर, दिलीप कुलकर्णी, विठ्ठल बडे, शेखर नवलपुरे, संजय रनदिवे, शैलेंद्र पाटील, दिनेश पोरे, सर्वजण रात्रभर फिरत होते. काही ठिकाणी यवतमाळ संघटनेचे अध्यक्ष तुळशीदास खसाळे, सदस्य ज्ञानेश्वर अजमिरे, श्री. डी. एल. बोढे यांनी वैयक्तीक भेटी घेतल्या. उपाध्यक्ष सुभाष पाटील व जिल्हाध्यक्ष संजय बोराटे शिष्टमंडळाने थेट मुख्यमंत्र्यांची भेट घेतली अशा प्रकारे सर्व जिल्हा प्रतिनिधी, संघटना प्रयत्न करत होते.

आमदार सुरजितसिंह ठाकुर यांनी पुन्हा तावडे साहेबांची भेट घेतली. पोलीस प्रशासनाने धरणे आंदोलनातील दोन व्यक्ती निमंत्रित केल्या. त्यात नगर जिल्हा संघटना अध्यक्षा अनुराधा थिटे व कोषाध्यक्ष सुभाष बागड सर यांचे मार्फत शिक्षणमंत्री तावडे साहेब यांना निवदेन दिले सोबत महेश माळवतकर होते पुन्हा विनंती केली. तावडे साहेबांनी मान्य केले बहिस्थ मुद्दा रद्द करणेबाबत व संगणक अर्हता देणेबाबत स्पष्ट आदेश दिले आणि संघटनेचा विजय झाला शासनाने न्याय दिला. याकामी मा. शिक्षणमंत्री तावडे साहेब यांचे खाजगी सचिव कापडनिस, उपसचिव सुवर्णा खरात, कक्षअधिकारी प्रमोद पाटील, प्रधान सचिव नंदकुमार साहेब, यांचेही सहकार्य मिळाले त्यांचेही आभार मानतो

एकंदरीत पटवर्धन ग्राऊंड आनंदाने फुलुन गेले. संस्थाचालकांना जीवनदान मिळाले अशी भावना व्यक्त होवुन आनंदी आनंद झाला याकामी अनेक मान्यवरांनी सहकार्य केले. सर्वांची नावे लिहण्यास दोन पाने लागतील मात्र या मान्यवरांना मी जिवंत असेपर्यंत विसरु शकत नाही. जीवनात हा आलेला खडतर प्रसंग लिहीताना डोळ्यात अश्रु वाहत आहेत त्याचा मात्र आनंद आहे. कारण ते अश्रु माझ्या राज्यातील ३५०० संस्था, जेष्ठ संस्थाचालक त्यांचे किमान दोन पिढीतील मुले आणि गेली कित्येक वर्षे आमच्या संस्थेत निर्देशक म्हणुन शिक्षकी काम करणारे १० हजार कुटुंबांना न्याय देवु शकलो याचे आनंदाश्रु आहेत. याकामी पुन्हा मुख्यमंत्री ना. देवेंद्रजी फडणवीस व शिक्षणमंत्री विनोदजी तावडे साहेब यांच्या प्रती ऋण व्यक्त करतो आभार मानतो आणि विनंती करतो असा प्रसंग प्रशासनाच्या आग्रहास्तव कधीही या परिवारावर येवु नये म्हणुन सहकार्य करावे आम्ही आपले आयुष्यभर ऋणी राहु.

यापुढे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अध्यक्ष दिनकर पाटील, आयुक्त सुखदेव डेरे, उपायुक्त राजेश क्षिरसागर, अशासकिय सदस्य रमेश खानविलकर, शहाजी डोंगरे, प्रभाकर हेरवाडे, विजय काकडे, चांदमल चांदीवाल, श्री. अशोक कांबळे, श्रीमती उज्वला गायकवाड यांचे सहकार्याने परीक्षा परिषदेत आधुनिकता, पारदर्शकता, सुसत्रता आणण्याचा प्रयत्न असुन या अभ्यासक्रमाच्या सर्व परीक्षा सुरळीत होवुन मॅन्युअलप्रमाणे लाखोंच्या संख्येने संगणकचालक लघुलेखक प्रशिक्षित करण्याचा प्रयत्न राहील. त्यातुन महाराष्ट्रात सुरु झालेला संगणक टायपिंग अभ्यासक्रम देशाच्या सर्व राज्यात पोहचविण्याचा प्रयत्न करुन तेथील संस्थाचालकांनाही दिशा देण्याचे काम संघटनेच्या माध्यमातुन करण्याचा प्रयत्न राहील. त्याचबरोबर ५५ वे अधिवेशन धुळे जिल्हा संघटनेने आयोजन करुन केलेल्या सहकार्याबद्दल स्वागताध्यक्ष संजय नाईक, कार्याध्यक्ष किशोर पाटील, जिल्हा प्रतिनिधी अशोक लोंढे, जिल्हाध्यक्ष संजय कुडे, स्मरणिका प्रमुख चंद्रकात कुलकर्णी, जिल्हा सचिव सुनिल ठाणगे, जिल्हा कोषाध्यक्ष अजय रनाळकर यांचेही विशेष आभार मानतो.

दिवसेंदिवस अधिवेशनाचा वाढत जाणारा खर्च आणि समारोपाच्या कार्यक्रमास कमी होणारी उपस्थिती लक्षात घेऊन अधिवेशन १ दिवसाचे घेवुन आमसभा व उद्घाटन सोहळयास प्राधान्य देऊन खर्चात काटकसर करण्याचा प्रयत्न असल्याने सर्वांनी या उपक्रमाचे स्वागत करुन सहकार्य करावे अशी विनंती करतो आणि माझे लांबलेले परंतु गरजेचे असलेले शब्दांकन पुर्ण करुन थांबतो.

जय MSCEIA...
जय हिंद...
जय महाराष्ट्र...

संपादक, मालक, प्रकाशक श्री. प्रकाश भीमराज कराळे, मुद्रक : संजीवनी मुकूंद दळवी, प्रकाशक : प्रेरणा सार्वजनिक वाचनालय, संदीपनगर, प्लॉट नं. ४, मार्केटयार्डजवळ, जि. अहमदनगर ४१४००१, महाराष्ट्र.
मुद्रण स्थळ : मनोज प्रिंट ॲण्ड प्रोसेसर्स, केडगाव देवी रोड, जि. अहमदनगर ४१४ ००५.

# स्वागताध्यक्षांचे मनोगत



महाराष्ट्र राज्य कॉमर्स एज्युकेशनल, इस्टिट्युट असोसिएशनच्या ५५ व्या राज्यस्तरीय वार्षिक दिनानिमित्त आपण खान्देशनगरीत आलात त्याबद्दल मी आपला आभारी आहे. तसे पाहिले तर यंदाचे ५५ वे अधिवेशन हे कोल्हापूर येथे होणार होते, परंतु त्यांच्या स्थानिक अडचणींमुळे ऐनवेळी धुळे येथे घ्यावे, असे अध्यक्ष श्री. प्रकाश कराळे सर व सभासदांशी चर्चा करून धुळे येथे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार येथील (धुळे) सभासदांशी चर्चा करून २२ जानेवारी २०१७ रोजी हे अधिवेशन घेण्याचे निश्चित करण्यात आले.

अधिवेशनाचा १९९२ चा अनुभव असल्याने अधिवेशन काय असते याची मला जाणीव होती, २५ वर्षापूर्वी घेतलेले अधिवेशन व आताचे अधिवेशन यात सभासद संख्येनुसार फरक आहे. त्याकाळी अधिवेशनास सभासदांची उपस्थिती कमी असायची. कालांतराने संस्थांबरोबर सभासदही वाढले. त्यानुषंगाने ज्या जिल्ह्यांमध्ये अधिवेशन घेण्यात आले, त्या जिल्ह्यातील प्रमुख व्यक्तींना मार्गदर्शनासाठी निमंत्रित करण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे सभासदांना अधिवेशनाचे काम करणे व नियोजन करणे सुलभ झाले.

मार्गदर्शनासाठी श्री. कराळे सर धुळ्यात आले व सभासदांना मार्गदर्शन केले त्यानंतर श्रीमती संध्याताई देशपांडे यांनी मार्गदर्शन करावे म्हणून सभासदांचा सहकुटुंब सहपरिवाराचा मेळावा घेण्यात आला. या मेळाव्यात संध्याताई देशपांडे यांनी सर्व संस्थाचालकांच्या सौभाग्यवतींना अधिवेशनात महिलांनी कशी मदत करावी, याबाबत मार्गदर्शन केले. आपल्या संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री. विरकुंवर अण्णा यांनी सुध्दा या कार्यक्रमास उपस्थित राहुन संघटनेचे महत्व पटवुन दिले.

टायपिंग व संगणक टायपिंग व्यवसायांच्या अडचणींवर मात करणे हे संघटनेशिवाय शक्य नाही. महाराष्ट्र व गोवा राज्यातील टायपिंग संस्थांना महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई या संघटनेच्या माध्यमातून संजीवनी प्राप्त झाली आहे. आपल्या व्यवहारात दिवसोंदिवस संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू झाल्यामुळे समाजात शास्त्रशुध्द पध्दतीने संगणक हाताळणाऱ्या युवक-युवतींचा तुटवडा पडु लागला. त्यातल्या त्यात नविन शासनाने सर्व व्यवहारांमध्ये डिजीटलायझेशन सुरू केल्यामुळे संगणकास अधिक महत्व प्राप्त झाले. सरकारनेही सर्व व्यवहारांमध्ये पेपरलेस व्यवहार सुरू केल्यामुळे संगणकाचा वापर सुरू झाला. परंतु त्या प्रमाणात समाजात शास्त्रशुध्द पध्दतीने डाटा ऑपरेटरची (टायपिस्ट) संख्या कमी आहे. हाच मुद्दा लक्षात घेऊन आपल्या संघटनेचे अध्यक्ष श्री. कराळे सर यांनी संगणक टायपिंगचा कोर्स सुरू करावा असे मनोमन ठरविले. व त्यानुषंगाने परिक्षा परिषद व राज्य शासनाकडे पाठपुरावा करून दि. १३ ऑक्टोंबर २०१३ रोजी शासनाकडून सर्व टायपिंग व्यवसाय करणाऱ्या संस्था चालकांसाठी संगणक कोर्स मंजुर करून घेतला. हा अभ्यासक्रम संघटनेच्या प्रयत्नामुळेच शासनाकडून मंजुर करणे शक्य झाले. यात तत्कालिन परिक्षा परिषदेचे अध्यक्ष महावीर माने यांचे मार्गदर्शन लाभले.

संगणक अभ्यासक्रम लागु करत असतांना संघटनेने परिक्षा परिषदेस सहकार्य केले. संगणक टायपिंग अभ्यासक्रम पुस्तिका बनविणे, परिक्षेची पद्वत, गुणदान पध्दत, प्रीकंडीशन ठरविणे, संगणकीय टायपिंग तपास पध्दत ठरविणे, परिक्षा केंद्रावर मदत करणे, आय. एस. एम. ६.२ बाबत निर्णय घेणे या सर्व गोष्टींसाठी राज्य संघटनेच्या माध्यमातून मिटींग परिक्षा परिषदेमध्ये आयोजित केल्या गेल्या. त्यात संघटनेच्या संगणक कमिटीमधील सदस्य मी स्वत:, सौ. ढमढरे मॅडम, मोहन भोमे, संतोष दाणी, अनिल कुलकर्णी सर, नंदकुमार देशमुख सर, अरूण चांडक, रविंद्र राऊत सर, प्रकाश कराळे, शैलेंद्र पाटील, गोवर्धन विरकुंवर सर, सुभाष बागड सर यांनीही मार्गदर्शन केले आहे.

या अभ्यासक्रमाच्या दोन बॅचच्या परिक्षा झाल्या तरी देखील अजुन कॉम्प्युटर टायपिंग परिक्षेसाठी अडचणी येत आहेत, त्या अडचणी सोडविण्याचे काम सुरू आहे. संगणक टायपिंग अभ्यासक्रम चांगल्या पध्दतीने तयार केला गेला आहे की, विद्यार्थी संगणक व टायपिंग अशा दोन्ही बाबतीत परिपूर्ण तयार होत आहेत. त्यामुळे खाजगी संस्थांना आकर्षण वाटू लागले आहे. त्यांनीही हा अभ्यासक्रम चालविण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न सुरु केले व त्यातील काही अधिकाऱ्यांच्या संगनमताने बहिस्थ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे भूत आपल्या माथी मारण्यात आले होते. हेच भूत उतरविण्यासाठी अडचणी आल्या, परंतु संघटनेचे एकीचे बळ असल्याने नागपूरसारख्या शहरात सर्व संस्थाचालकांच्या उपस्थितीत धरणे आंदोलन राबविण्यात आले. महाराष्ट्रातील जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन अनेक आमदार-खासदारांचे, पदाधिकाऱ्यांचे सहकार्य घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यास संघटनेला यश आले आहे.

त्या निमित्ताने संस्थाचालकांना आवाहन करतो, मागण्या, अडचणींवर मात करायची असेल तर राज्य संघटनेशिवाय दुसरा पर्याय नाही. त्यासाठी संघटना मजबुत पाहिजे. संघटनेसाठी आपण काहीतरी देणे लागतो, ही भावना मनात ठेवा.

मा.श्री. सुभाषजी भामरे हे धुळे जिल्ह्यातील पहिले केंद्रीयमंत्री असल्याने त्यांचा सत्कार आपण करीत आहोत. शिक्षणमंत्री मा. श्री. विनोदजी तावडे साहेब यांनी वेळोवेळी मोलाचे सहकार्य केल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करीत आहोत. मा. जयकुमारजी रावल, मा. दादासाहेब भुसे यांच्या सहकार्याबद्दल आपण त्यांचा सत्कार करीत आहोत.

संघटनेचे शासनस्तरावर प्रश्न सोडविण्यासाठी सहकार्य करणारे मा. आ. तान्हाजीराव मुटकुळे, मा. आ. अतुलजी सावे, मा. श्री. सुरजितसिंह ठाकुर यांचाही सत्कार करीत आहोत. मा. आ. अमरीशभाई पटेल, मा. आ. डी. एस. अहिरे, माजी आ. राजवर्धन कदमबांडे, मा. आ. कुणाल पाटील, मा. आ. काशिराम पावरा, मा. आ. डॉ. सुधीर तांबे हे मान्यवर आपल्याला सहकार्य करीत असतात. आपल्या अधिवेशनात आर्थिक सहकार्य करणारे मा. गोपाळराव केले साहेब व चंद्रकात केले, परिक्षा परिषदेचे अध्यक्ष दिनकरराव पाटील, रत्नागिरीचे नगराध्यक्ष (संस्थाचालक) श्री. राहुल पंडीत, तेल्हाराच्या नगराध्यक्षा (संस्थाचालिका) जयश्री पुंडकर, परिक्षा परिषदेचे आयुक्त सुखदेव डेरे, उपाआयुक्त राजेश क्षिरसागर, शिक्षण उपसंचालक रामचंद्र जाधव, सहाय्यक शिक्षण उपसंचालक दिलीप गोविंद साहेब, शिक्षणाधिकारी प्रविण पाटील साहेब, संघटनेचे मार्गदर्शक महेश माळवतकर व रमेशजी खानविलकर या पदाधिकाऱ्यांची उपस्थितीबद्दल त्यांचाही आभारी आहे.

अधिवेशन पार पाडीत असतांना हे सर्व माझे एकट्याचे काम नव्हते, म्हणून अधिवेशन पुर्णत्वास येण्यासाठी धुळे जिल्ह्यातील मला मोलाचे सहकार्य करणारे जिल्हाध्यक्ष संजय कुडे, जिल्हा प्रतिनिधी अशोक लोंढे, कार्याध्यक्ष किशोर पाटील, जिल्हा सचिव सुनिल ठाणगे, कोषाध्यक्ष अजय रनाळकर, स्मरणिका जबाबदारी पार पाडणारे चंद्रकांत कुलकर्णी, श्रीकांत सोनार, पंकज विंचू व सर्व धुळे जिल्हा संघटनेचे सभासद यांचा मी शतश: आभारी आहे. धन्यवाद !

---

Reg. under Bom.4/1962 GBBSD societies act, 1860 & public trusts Act of 1950 Reg. No.F-934

## महाराष्ट्र राज्य टंकलेखन-लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई

७९,के.टी.आय, महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड, अहमदनगर -४१४००१.

फोन नं.०२४१-२३२२६३९ वेबसाईट - www.msceia.com, www.msceia.in

जा.क्र.एमएससीईआयए/५५ वी आमसभा/२०१७ दि.०६/०१/२०१७

## ५५ वी वार्षिक आमसभा
## (फक्त आजीव सभासदांकरिता)

महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य शैक्षणिक संस्थांची संघटना, मुंबई ची **५५ वी आमसभा** वार- **रविवार**, दि. **२२/१/२०१७** रोजी **सकाळी ११.०० वाजता** ठिकाण : **हिरे भवन, स्टेशन रोड,धुळे** या ठिकाणी अध्यक्ष श्री. प्रकाश भिमराज कराळे यांचे अध्यक्षतेखाली खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे.

तरी आपण आम सभेस आवश्य उपस्थिती रहावे हि विंनती.

## सभेपुढील विषय

१. संघटनेच्या ५५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे विषय पत्रिकेचे वाचन करणे.
२. अकोला येथील १३/१२/२०१५ रोजीच्या ५४ व्या आमसभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३. सन २०१५-१६ च्या अहवालाची नोंद घेणे (जनरल सेक्रेटरी अहवाल सादर करतील)
४. मा. चार्टर्ड अकौंटंट यांचेकडून प्राप्त झालेले असोसिएशनचे ३१/३/२०१६ अखेरच्या आर्थिक पत्रकांना मान्यता देणे. (कोषाध्यक्ष आर्थिक पत्रकांचा अहवाल सादर करतील)
५. सन २०१७-१८ या वर्षातील कामकाजाची रुपरेषा ठरविणे.
६. शासनाकडील परीक्षा परिषदेकडील मागण्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
७. संघटनेच्या वाढीव शेअर्स रक्कम व इमारत निधीचा आढावा घेणे.
८. संघटनेची प्रोसेसिंग फी, परीक्षा फी(संगणक टायपिंग) कार्यकारी सभा, प्रवास व परिक्षा खर्चाबाबत व ३०,४० श.प्र.मि., स्पेशल स्किल अभ्यासक्रम पुस्तके छपाईबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
९. संघटनेच्या पुणे येथे कार्यालय / निवास व्यवस्था कामी खरेदीची अथवा दिर्घ मुदतीची जागा भाडे कराराने घेणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
१०. मॅन्युअल टायपिंग अभ्यासक्रम मे - २०१७ ला बंद होणार असल्याने चर्चा करुन निर्णय घेणे.
११. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे.

**मा.कार्यकारी समिती यांचे समंतीने**

**ठिकाण:**
**दि. ०६/०१/२०१७**

**शैलेंद्र पाटील**
**जनरल सेक्रेटरी**

---

टिप : १. कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास, अर्ध्या तासाने सभा त्याच ठिकाणी सुरु करण्यात येईल व अशा सभेस कोरम ची आवश्यकता राहणार नाही. २. सभासदांना आमसभेत काही प्रश्न विचारावयाचे झाल्यास असे प्रश्न लेखी स्वरुपात दि. १७/०१/२०१७ अखेर अध्यक्ष/महासचिवांकडे पाठवावेत. ३. वार्षिक अहवाल, आर्थिक पत्रके सोबत जोडली आहे सभासदांना सभेच्या ठिकाणी देण्यात येतील आणि संघटना वेबसाईट व प्रेरणा जनहित मंच मासिकातुन प्रसिध्द केले आहे ४.संस्थेच्या ५४ व्या आमसभेचे इतिवृत्त संघटनेच्या आजीव सभासदांसाठी संघटनेच्या वेबसाईटवर ( www.msceia.com ) उपलब्ध करुन दिलेले आहे.

## कार्यक्रमाची रुपरेषा

| | | |
|---|---|---|
| शनिवार दि. २१ जानेवारी २०१७ | दुपारी ५.०० वाजता | सभासद नोंदणी - कार्यक्रम स्थळी |
| शनिवार दि. २१ जानेवारी २०१७ | रात्री ७.०० वाजता | राज्य कार्यकारिणीची सभा |
| रविवार दि. २२ जानेवारी २०१७ | सकाळी ७.०० ते ९.३० | सभासद नोंदणी व चहा-अल्पोपहार |
| रविवार दि. २२ जानेवारी २०१७ | सकाळी १०.०० ते १.०० | केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री मा.ना.श्री.सुभाषजी भामरे यांचा विशेष सत्कार समारंभ व राज्य संघटनेची वार्षिक आमसभा |
| रविवार दि. २२ जानेवारी २०१७ | सकाळी १.०० ते ०२.३० | भोजन |
| रविवार दि. २२ जानेवारी २०१७ | दुपारी २.३० ते ४.०० | कार्यशाळा (संगणक अभ्यासक्रम) |
| रविवार दि. २२ जानेवारी २०१७ | दुपारी ४.०० ते ६.३० | अधिवेशन उद्घाटन सोहळा, मान्यवरांचा सत्कार समारंभ, स्मरणिका प्रकाशन व समारोप |
| रविवार दि. २२ जानेवारी २०१७ | सांय ७.०० वा. | भोजन |

**रविवार दि.२२/१/२०१७ रोजी ज्या प्रतिनिंधींना थांबावे लागेल त्यांची राहण्याची व्यवस्था केली जाईल मात्र अगोदर कळवावे.**

**संपर्क :** **संजय नाईक** - ९४२२७८७१०५, **किशोर पाटील** - ९४२२२९६०८२, **अशोक लोंढे** - ९२७१२९१११९७, **संजय कुडे** - ९४२१५२६४५७

टिप : १) सदर कार्यक्रमास नोंदणी शुल्क प्रत्येकी २०० रुपये भरावे.
२) येतांना प्रत्येकाने पासपोर्ट फोटो सोबत आणावा. आपणास ओळखपत्र दिले जाईल,ओळखपत्रा शिवाय प्रवेश दिला जाणार नाही.
३) चहा, नाश्ता, भोजन याचे कुपन दिले जाईल, कुपना शिवाय भोजन कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.
कपया सभासदांनी याची नोंद घ्यावी

# THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1950
## SCHEDULE IX-C (Vide Rule 17(1) )

**Name of the Public Trust :- MAHARASHTRA RAJYA TANKLEKHAN LAGHULEKHAN SHASANMANYA SANSTHANCHI SANGHATANA, MUMBAI.**

**Registration No. F - 934 (M)**

## INCOME & EXPENDITURE ACCOUNT FOR THE YEAR ENDED 31ST MARCH, 2016

| EXPENDITURE | RS. | RS. | INCOME | RS. | RS. |
|---|---|---|---|---|---|
| **To Expenditure in respect of Properties :** | | | | | |
| Rates, Taxes, Cesses | | | **By Rent :** Accrued | | |
| Repairs and Maintenance | | | Realised | | 0 |
| Salaries | | | | | |
| Insurance | | | **By Interest :** Accrued | | |
| Depreciation (by way of | | | Realised | 254008 | |
| provision or adjustments) | | 0 | on Securities | | |
| | | | on Loans | | 254008 |
| **To Other expenses** | | | | | |
| Honorarium to Dist. Representatives | 108000 | | **By Dividend** | | 0 |
| Advertisement Expenses | | 108000 | | | |
| | | | **By Donation in Cash or Kind** | | 0 |
| **To Establishment Expenses** | | | | | |
| Printing and Stationary | 81127 | | **By Grant Received** | | 0 |
| Postage and Telegram | | | | | |
| Newspaper and Periodicals | | | **By Royalty Received** | | 18000 |
| Annual Meeting (Adhiveshan) Expenses | 35000 | | | | |
| Meeting Expenses | 44810 | | **By Processing Fees** | | 73100 |
| Special Programme Expenses | 137824 | | | | |
| Website Development Expenses | 16599 | | **By Income from other Sources** | | |
| Office Expenses | | 315360 | Examination Fees | | 3484600 |
| | | | Other Income ( Written Back) | | |
| **To Remunaration To Trustees** | | 0 | For Expenses | 3000 | |
| **To Remuneration** | | 0 | For Advances from L M | 8045 | 11045 |
| (In case Of a Maths To The head Of | | | | | |
| Math,Including His House hold | | | **By Other Receipts :** | | |
| Expenditure, if any) | | | (in details as far as possible) | | |
| | | | Annual Membership Fees | | |
| **To District Association contribution** | | 0 | Members Contribution | | |
| **To Legal Expenses** | | 2000 | Sale Of Old Newspapers | | 0 |
| **To Audit Fees** | | 6000 | | | |
| **To Account writing Charges** | | 4000 | **By Liabrary Fees** | | 0 |
| **To Amount Written off** | | | **By Transfers From Reserves** | | |
| a) Bad Debts (Sultan Sayyad) | 39658 | | | | |
| b) Loan Scholarship | | | **By Deficiet Carried Over to -** | | |
| c) Irrecoverable Rents | | | **Balance Sheet** | | 0 |
| d) Other items | | 39658 | | | |
| **To Miscellaneous Expenses** | | | | | |
| Travelling Expenses | | | | | |
| Office Rent | | | | | |
| Bank Charges | 2385 | | | | |
| Electricity Expenses | | 2385 | | | |
| **To Depreciation** | | 0 | | | |
| **To Amount Transferred to Reserve** | | | | | |
| **or Specific fund** | | 0 | | | |
| **To Expenditure on objet of the Trust :** | | | | | |
| a. Religious | | | | | |
| b. Educational | 2024625 | | | | |
| c. Medical Relief | | | | | |
| d. Relief on Poverty | | | | | |
| e. Other Chartiable Objects | | 2024625 | | | |
| **To Surplus carried over to** | | | | | |
| **BalanceSheet** | | 1338725 | | | |
| **Total Rs.** | | **3840753** | **Total Rs.** | | **3840753** |

**As per our report of even date**
**For M/s. Kanakiya & Mehta Associates**
**Chartered Accountants**

**Mr. Abhay A. Katariya**
**Partner**
**Mem. No. 113895**

Kanakiya & Mehta Associates ★ Firm Reg. No. 104702W Ahmednagar ★ Chartered Accountants

**Dated at 02/12/2016**

**Place : Ahmednagar**

**THE BOMBAY PUBLIC TRUST ACT 1956**

**SCHEDULE VII (Vide Rule 17(1) )**

**Name of the Public Trust :- MAHARASHTRA RAJYA TANKLEKHAN LAGHULEKHAN SHASANMANYA SANSTHANCHI SANGHATANA, MUMBAI.**

**Registration No. F - 934 (M)**

**BALANCESHEET AS ON 31ST MARCH, 2016**

| FUNDS & LIABILITIES | RS. | RS. |
|---|---|---|
| **TRUST FUNDS OR CORPUS** | | |
| Life Membership Fees | | |
| Balance as per last Balance Sheet | 739675 | |
| Add : Addition During the year | 217225 | |
| Less : Withdrawal during the year | 1100 | 955800 |
| **OTHER EARMARKED FUNDS** | | |
| (Created under the provisions of the Trust Deed or scheme or out of the Income) | | |
| Depreciation Fund | | |
| Sinking Fund | | |
| Reserve Fund | | 0 |
| **Any Other Fund** | | |
| **I) Building Fund** | | |
| Balance as per last Balance Sheet | 9249 | |
| Add : Addition During the year | 292275 | |
| Less : Withdrawal during the year | 1325 | 300199 |
| **II) Royalty** | | |
| Balance as per last Balance Sheet | | |
| Add : Addition During the year | | |
| Less : Withdrawal during the year | | 0 |
| **LOANS (SECURED OR UNSECURED) :** | | |
| From Trustee | | |
| Bank Balance | | 0 |
| **LIABILITIES** | | |
| For Expenses | | |
| For Advances from L M | | 0 |
| **Provisions** | | |
| For Audit Fees | 5000 | |
| For Rent and Other Deposits | | |
| For Sundry Credit balances | | |
| For Account Writing Charges | 4000 | 9000 |
| **INCOME AND EXPENDITURE ACCOUNT** | | |
| Balance as per last Balance Sheet | 2569431 | |
| Less : Appropriation if any | | |
| Add : Surplus as per Income & Exp. A/c | 1338725 | |
| Add : Deficit as per Income & Exp. A/c | | 3908156 |
| **Total Rs.** | | **5173155** |

| PROPERTY & ASSETS | RS. | RS. |
|---|---|---|
| **IMMOVABLE PROPERTIES** | | |
| (at cost) | | 0 |
| **INVESTMENTS :** | | |
| Fixed Deposits with Bank | 1151215 | |
| Deposits | | |
| Add : New FD with Bank | 116817 | |
| Less : Wrongly Excess insterest Received | - | 1268032 |
| Tax Deducted at Source 2010-11 | 8481 | |
| Tax Deducted at Source 2011-12 | 8620 | |
| Tax Deducted at Source 2012-13 | 7650 | |
| Tax Deducted at Source 2013-14 | 11053 | |
| Tax Deducted at Source 2014-15 | 668 | |
| Tax Deducted at Source 2015-16 | 652 | 37124 |
| **FURNITURE & FIXTURES** | | |
| Balance as per last Balance Sheet | | |
| Add : Addition during the year | | |
| Less : Sales during the year | | |
| Less : Depreciation @ 10% | | 0 |
| **Liabrary Books** | | |
| Balance as per last Balance Sheet | | |
| Add : Addition during the year | | |
| Less : Sales during the year | | |
| Less : Depreciation @ 10% | | 0 |
| **Liabrary Books (Others)** | | 0 |
| **LOANS (SECURED OR UNSECURED) :** | | |
| Goods / Doubtful | | |
| Loan Scholarship | | |
| Other Loans | | 0 |
| **ADVANCES :** | | |
| To Trustees | | |
| To Employees | | |
| To Others- | | |
| Examination Department | | 0 |
| **INCOME OUTSTANDING** | | |
| Rent | | |
| Interest | | |
| Other Income | | 0 |
| **CASH AND BANK BALANCES-** | | |
| A. In Current Account - | | |
| IDBI Bank Balance | 663402 | |
| Axis Bank Balance | 3203992 | 3867394 |
| B. With The Trustees | | 605 |
| **INCOME & EXPENDITURE ACCOUNT :** | | |
| Balance As Per Last Balancesheet | | |
| Less : Appropriation, If any | | |
| Add: Surplus as Per Income & Exp. A/c | | |
| Less : Deficit as Per Income & Exp. A/c | | 0 |
| **Total Rs.** | | **5173155** |

**For M/s. Kanakiya & Mehta Associates**
**Chartered Accountants**

**Mr. Abhay A. Katariya**
**Partner**
**Mem. No. 113895**

Kanakiya & Mehta Associates ★ Chartered Accountants ★ Firm Reg. No. 104702W Ahmednagar

**The above Balance Sheet to the best of My /Our Belief Contains a True Acounts Of The Funds and Liabilities and of the Property and Assets Of the trust**

**Date 02/12/2016**
**Place-Ahmednagar**

**TRUSTEE**



मुंबई येथे ५५ व्या अधिवेशनाचे उद्घाटन समारंभाचे निमंत्रण शिक्षणमंत्री मा. ना. विनोदजी तावडे यांना देताना स्वागताध्यक्ष तथा संघटनेचे परिक्षा सचिव संजय नाईक. समवेत कार्याध्यक्ष किशोर पाटील, स्मरणिका प्रमुख चंद्रकांत कुलकर्णी, प्रमोद वाणी इत्यादी.



सुधारित नियमावली २०१६ मधील अ. क्र. १४.३ बहिस्त विद्यार्थी शब्दरचना काढून टाकणे आणि संगणक अर्हता तातडीने प्रदान करणे याकामी राज्यातील संस्था चालकांच्यावतीने १६ डिसेंबर २०१६ रोजी पटवर्धन ग्राऊंड (नागपूर) येथे करण्यात येणाऱ्या धरणे आंदोलनाचे निवेदन देताना मी (प्रकाश कराळे) समवेत महेश माळवतकर, दिलीप कुलकर्णी, विठ्ठल बडे, शेखर नवलपुरे इ.



नागपूर येथील धरणे आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील संस्थाचालक, प्रसिद्धीप्रमुख निळकंठ कुंभार, पी. आर. कुलकर्णी, अध्यक्ष अजय निकते.



संस्थाचालकांच्या मागण्यांसाठी नांदेड जिल्ह्यातील संस्थाचालक व जिल्हा संघटना अध्यक्ष संजय बोराटे, सचिव प्रविण पाटील यांनी विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांची भेट घेऊन मागण्याकामी लक्ष वेधण्याची विनंती केली.



राज्य संघटनेच्या दि. १६ डिसेंबर २०१६ रोजी झालेल्या धरणे आंदोलनासंदर्भात मा. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या समवेत बहिस्त विद्यार्थी ही परवानगी शासनमान्य संस्थावर अन्यायकारक असल्याचे आणि संगणक टायपिंग अभ्यासक्रमास संगणक अर्हता तातडीने प्रदान करणेबाबत चर्चा करताना विधान परिषदेचे आमदार सुरजितसिंग ठाकूर, आमदार अतुल सावे, आमदार तानाजी मुटकुळे, महेश माळवतकर, दिनेश पोरे, दिलीप कुलकर्णी, विठ्ठल बडे, शेखर नवलपुरे.



राज्य संघटनेच्या धरणे आंदोलनात सहभागी झालेल्या सुमारे ८०० संस्थाचालकांच्या वतीने आणि पोलिस प्रशासनाच्या सुचनेनुसार दोन आंदोलकांनी मा. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांना सविस्तर निवेदन देणेकामी गेलेल्या नगर जिल्हा संघटनेच्या अध्यक्षा श्रीमती अनुराधा थिटे व महेश माळवतकर आणि संघटनेच्यावतीने कोषाध्यक्ष सुभाष बागड.



नागपूर येथील धरणे आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी प्रसिद्धीप्रमुख निळकंठ कुमार व पी. आर. कुलकर्णी, अध्यक्ष अजय निकते यांच्यासमवेत सोलापूर जिल्ह्यातील संस्थाचालक मोठ्या संख्येने टोप्या परिधान करुन व हातात मागण्यांचे निवेदन घेऊन उपस्थित होते.



राज्यातील संस्था चालकांच्या सुधारित नियमावलीतील मागण्याकामी लक्ष देण्याबाबत केंद्रीयमंत्री हंसराज आहेर यांची भेट घेऊन मागण्या सादर करताना वरिष्ठ उपाध्यक्ष गोवर्धन विरकुवर, सहसचिव संतोष दाणी, कार्यकारणी सदस्य सल्लाउद्दिन पठाण, संजय शिंदे.



राज्य संघटनेच्यावतीने मागण्यांचे आणि ५५ व्या अधिवेशनाचे निमंत्रण मा. महसूलमंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांना देताना स्वागताध्यक्ष संजय नाईक, महेश माळवतकर, दिलीप कुलकर्णी, ॲड. विठ्ठल बडे, चंद्रकांत कुलकर्णी.



राज्य संघटनेच्या धरणे आंदोलनास सोलापूर जिल्ह्यातील आमदार मा. विधी व न्यायमंत्री दिलीप सोपल, माढाचे (जि. सोलापूर) आमदार बबनराव शिंदे, मंगळवेढा-पंढरपूर मतदार संघाचे आमदार भारतनाना भालके, माळशिरसचे आमदार हनुमंत डोळस यांनी भेट देऊन संस्थाचालकांना मार्गदर्शन करुन मागण्या सोडवण्याकामी शासनाकडे आग्रही राहण्याचे आश्वासन दिले.



राज्य संघटनेच्या धरणे आंदोलनास यवतमाळ जिल्ह्यातील भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजुभाऊ डांगे यांनी मा. शिक्षणमंत्री विनोद तावडे यांची भेट घेऊन मागण्या मान्य करण्याबाबत आग्रह धरला. समवेत ज्येष्ठ संस्थाालक डी. एल. बोढे, सुरेश पुराणकर, दिपक कांबळे, संघटनेचे जिल्हाध्यक्ष तुळसीदास खसाळे व संस्थाचालक.



राज्य संघटनेच्या धरणे आंदोलनात पटवर्धन ग्राऊंड येथे भर उन्हात सहभागी झालेला प्रचंड जनसमुदाय.



मा. आमदार संग्रामभैय्या जगताप व विद्यार्थी परिषदेचे प्रदेशाध्यक्ष संग्राम कोते यांनी धरणे आंदोलनाच्या ठिकाणी भेट देऊन संस्था चालकांना शासनाकडून न्याय मिळवून देण्याची ग्वाही दिली.



सर्व जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांना राज्य कार्यकरणी सदस्यांच्या वतीने सामुहिक निवेदन देण्यात आले. अशाच प्रकारे पालघर जिल्हा संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देताना राज्य कार्यकारणी सदस्य समीर म्हात्रे व जिल्हा सचिव सौ. हटकर व संस्थाचालक.




बहिस्थ विद्यार्थी तरतूद रद्द करा व शासनादेश ३१ ऑक्टोबर २०१३ अन्वये सुरु झालेला संगणक टायपिंग अभ्यासक्रमास संगणकार्हता लागू करा या संघटनेच्या मागणीला साथ देऊन सातारा, उस्मानाबाद येथून नागपूर येथे आंदोलनस्थळी आपल्या न्याय हक्कासाठी लढा यशस्वी करण्यास साथ देणारे सातारा जिल्ह्यातील संस्थाचालक व संघटनेचे सहकोषाध्यक्ष प्रकाश शहा व प्रवक्ते दिनेश पोरे या दोन्ही साठीतील सदस्यांनी कंबर कसून लढा यशस्वी करण्यास हातभार लावला.



शेवटी राज्याचे शिक्षणमंत्री यांनी आमदार महोदय यांना मागण्या मान्य केल्याबाबतचे आश्वासन दिल्यानंतर आणि प्रत्यक्ष खासगी सचिव यांनी उपसचिव यांना तात्काळ प्रस्ताव सादर करण्याबाबतचे आदेश दिल्यानंतर मागण्या मान्य झाल्याबद्दल समस्त संस्था चालकांच्यावतीने आनंद साजरा करताना श्री. हेमंत ढमढेरे, प्रकाश शहा, संजय रणदिवे, विठ्ठल बडे, महेश माळवतकर, अरुण चांडक, रमेश खानविलकर इ.

## राज्य कार्यकारिणी

श्री. प्रकाश कराळे (अध्यक्ष)
श्री. संजय नाईक (परीक्षा सचिव)
श्री. संतोष दाणी (सहसचिव)
श्री. संजय शेंडे (उपाध्यक्ष)
श्री. सुभाष पाटील (उपाध्यक्ष)
श्री. प्रकाश शाह (सहकोषाध्यक्ष)
श्री. अनिल कुलकर्णी (कार्यकारणी सदस्य)
श्री. रामचंद्र खत्री (कार्यकारणी सदस्य)
श्री. प्रशांत पाठक (कार्यकारणी सदस्य)
श्री. प्रमोद वाणी (कार्यकारणी सदस्य)
श्री. देवलाल इंगोले (कार्यकारणी सदस्य)
श्रीमती संध्याताई देशपांडे (कार्यकारणी सदस्या)
श्री. समीर म्हात्रे (कार्यकारणी सदस्य)

श्री. गोवर्धन विरकुंवर (वरिष्ठ उपाध्यक्ष)
श्री. सुभाष बागड (कोषाध्यक्ष)
श्री. हेमंत ढमढेरे (उपाध्यक्ष)
श्री. मोहन भोमे (उपाध्यक्ष)
श्री. सुनिल भालेराव (उपाध्यक्ष)
श्री. राजेंद्र हिरपुरकर (उपाध्यक्ष)
श्री. निलकंठ कुंभार (प्रसिद्धी प्रमुख)
श्री. प्रकाश रेळेकर (कार्यकारणी सदस्य)
श्री. सलाउद्दीन पठाण (कार्यकारणी सदस्य)
श्री. नरेश बोमेवार (कार्यकारणी सदस्य)
श्री. अशोक लोंढे (कार्यकारणी सदस्य)
श्रीमती जयश्री पाटील (कार्यकारणी सदस्या)
श्री. अनुरथ घुमरे (कार्यकारणी सदस्य)

श्री. शैलेंद्र पाटील (महासचिव)
श्री. दिनेश पोरे (प्रवक्ता)
श्री. प्रभाकर सुकाळे (उपाध्यक्ष)
सौ. अभिलाषा नाईक (उपाध्यक्षा)
श्री. घन:शाम कुंबळकर (उपाध्यक्ष)
श्री. अरुण चांडक (कार्यकारणी सदस्य)
श्री. गोविंद बोभाटे (कार्यकारणी सदस्य)
श्री. रमेश कावळे (कार्यकारणी सदस्य)
श्री. ज्ञानेश्वर अजमिरे (कार्यकारणी सदस्य)
श्री. नंदकुमार देशमुख (कार्यकारणी सदस्य)
श्री. श्रीकांत जोशी (कार्यकारणी सदस्य)
श्री. प्रदीप कुलकर्णी (कार्यकारणी सदस्य)
श्री. मनोज महाजन (सदस्य, समन्वय समिती)

## विनीत


**प्रकाश कराळे**
अध्यक्ष, राज्य संघटना


**संजय नाईक**
स्वागताध्यक्ष, राज्य संघटना


**गोवर्धन विरकुंवर**
वरीष्ठ उपाध्यक्ष, राज्य संघटना


**शैलेंद्र पाटील**
महासचिव, राज्य संघटना


**किशोर पाटील**
कार्याध्यक्ष, अधिवेशन


**अशोक लोंढे**
जिल्हा प्रतिनिधी


**संजय कुडे**
अध्यक्ष, धुळे जिल्हा


**चंद्रकांत कुलकर्णी**
स्मरणिका प्रमुख


**सुनिल ठाणगे**
सचिव, धुळे जिल्हा


**अजय रनाळकर**
कोषाध्यक्ष, धुळे जिल्हा

## धुळे जिल्हा कार्यकारिणी व सदस्य

श्री. सुरेंद्र मोतीवाले
सौ. लता सोनवणे
श्री. सुरेश हरळ
श्री. सतिष पुराणिक
श्री. दिनेश जोगी
सौ. चंद्रकला परदेशी
श्री. विलास पाटील
सौ. संध्या कुळकर्णी
श्री. गणेश थोरात
श्री. हेमंत सोनवणे
कु. नेहा पारोळेकर
श्री. योगेश देसले
श्री. प्रकाश ततार

श्री. अशोक पाठक
श्री. सतीष जोशी
श्री. अनंत जोगी
श्री. अविनाश देवळे
श्री. दिपक पाटील
श्री. आर. व्ही. पाटील
श्री. मच्छिंद्र वाघ
श्री. राजेंद्र मुसळे
श्री. अरूण पाटील
सौ. सुरेखा पाटील
श्री. साजीद पठाण
श्री. विशाल भोई

श्री. विनोद वाणी
श्री. राजेंद्र मुळे
श्री. अनिल कोठावदे
सौ. कल्पना बागुल
श्री. किरण कासार
श्री. प्रभाकर बाविस्कर
श्री. जवाहरलाल निकम
श्री. राजेंद्र माळी
सौ. रंजना कदम
श्री. सतिष साठे
सौ. शोभा नावरकर
श्री. प्रमोद वाणी

श्री. डी. आर. महाजन
श्री. श्रीकांत सोनार
श्री. विनायक कोठावदे
श्री. किशोर कुलकर्णी
सौ. वृषाली नगरदेवळेकर
सौ. रेखा पाठक
सौ. छाया पुराणिक
श्री. ईश्वरलाल बिऱ्हाडे
श्री. व्ही. सी. चौधरी
श्री. पंकज विंचू
सौ. ज्योती गव्हाणे
सौ. प्रतिभा वाणी

५५ राज्यस्तरीय अधिवेशन
सस्नेह निमंत्रण

चलो धुळे.. चलो धुळे... चलो धुळे...

**महाराष्ट्र राज्य टंकलेखन - लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई**

२२ जानेवारी २०१७ वेळ दुपारी ४ वाजता । स्थळ : हिरे भवन, स्टेशन रोड, कोर्टा समोर, धुळे

आयोजक : धुळे जिल्हा टायपिंग-शॉर्टहॅण्ड शासनमान्य संस्था चालकांची असो. धुळे